

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

November- 2021

ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Special Issue - 281

## History & Literature

**Guest Editor**

Prin. Dr. Sukhada Jamble

**Executive Editors**

Prof. Shrikant Sirsathe

Dr. Mahendra Kamat

**Chief Editor**

Dr. Dhannraj Dhangar

RESEARCH JOURNEY

MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**November 2021** **E-ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Special Issue 280

**Guest Editor :**
Dr. Sukhada Jamble
Principal,
Shri. S. H. Kelkar College of Arts,
Commerce & Science, Devgad
Dist. Sindhudurg

**Executive Editors :**
Prof. Shrikant V. Sirsathe
Dr. Mahendra Kamat

**Chief Editor :** Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : **www.researchjourney.net**

*Cover Photo (Source) : Internet

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-

# INDEX



| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Retracing the Trauma of Partition from the Selected Literary Works of Bapsi Sidhwa and Chaman Nahal | **Dr. Aditi Joshi** | 04 |
| 02 | Arwi Language and its Historical Landscape : An Overview | **Dr. K. M. A. Ahamed Zubair** | 08 |
| 03 | Literature as Historical Archive | **Dr. Balasaheb Yadav** | 11 |
| 04 | Mysterious Hibernation to Majestic Eminence : Historic Evolution in Literary Reception of Jibanananda Das's *'Rupasi Bangla'* | **Durbadal Datta** | 17 |
| 05 | Recreating History in Literature : A Study of 'Inquisition' in Mahabaleshwar Sail's *'Yug Sanvar'* | **Dr. Dattaguru Joshi** | 23 |
| 06 | Literature as the Reflection of History | **Dr. Mouchumi Dutta** | 28 |
| 07 | Karbi Folk Literature : A Study from Historical Perspective | **Dr. Jatin Sharma** | 31 |
| 08 | Analysis of *'Pali'* As Representation of Literature of Partition | **Dr. Manisha Mujumdar** | 39 |
| 09 | Representation of History in Manto's *'Open It!'* | **Dr. Satish Saykar, Dr. Vijay Padalkar** | 43 |
| 10 | Historical Novels : Facts Mingling With Fiction - An Inward Look Into Mizo History and Culture through the Novel *'Zorami'* by Malsawmi Jacob | **Pauline Lallawmzuali** | 45 |
| 11 | Representation of History in Girish Karnad's *'Tughlaq'* | **Dr. Rajesh Shesham** | 49 |
| 12 | Evolution of Historical Fiction in Contemporary Indian Writings in English | **Saritha Samuel** | 53 |
| 13 | An Overview of History and Literary Theory | **Shaziya Mohammed Irfan Momin** | 57 |
| 14 | The Postcolonial Tradition of Picture in the History in Kiran Desai's *'The Inheritance of Loss'* - A Study | **T. Narayana** | 59 |
| 15 | Portrayal of Gandhi in Shashi Tharoor's *'The Great Indian Novel'* | **Dr. Umakant Padamwar** | 64 |
| 16 | Proverbs as Source of Historical Facts : A Study of Selected Short Stories | **Dipak Ganmote** | 75 |
| 17 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील साहित्यिक | **डॉ. मधुकर जाधव** | 79 |
| 18 | इतिहास, साहित्य आणि आधुनिक संदर्भसाधने | **श्री. एस.एन. पाटील** | 87 |
| 19 | स्त्रीवादी साहित्य कादंबरी (१८५० ते १९५०)एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप | **प्रा. श्री. अमोल कुंभार** | 95 |
| 20 | विश्वास पाटील यांच्या संभाजी कादंबरी मधून चित्रित होणारे व इतिहासाला कलाटणी देणारे धर्मवीर संभाजी महाराजांचं व्यक्तिचित्रण एक अभ्यास | **प्रा. सौ. अनुष्का रेवंडकर** | 101 |
| 21 | साहित्यातून इतिहासाच्या त्यागमय पानाची कहाणी अनंत तिबिले यांची 'महाराणी येसूबाई' ही कादंबरी | **प्रा. सौ. एस.एस. पाटील** | 105 |



*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

# साहित्यातून इतिहासाच्या त्यागमय पानाची कहाणी अनंत तिबिले यांची' महाराणी येसूबाई' ही कादंबरी

**प्रा. सौ. एस.एस. पाटील**
मराठी विभाग
आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी.
जि.सिंधुदुर्ग.416810, महाराष्ट्र
मोबा.9421148047, ई-मेल - patilsanjivani07@gmail.com

**प्रास्ताविक :**

*भौगोलिकता आणि ऐतिहासिकता हे दोन घटक प्रत्येक मानवी समाजासाठी महत्त्वाचे असतात. भौगोलिकतेतून तो समूह विशिष्ट नावाने ओळखला जातो तर ऐतिहासिकतेतून त्या समूहाची एकूणच जडणघडण याची ओळख होत असते. प्रत्येक समूहाला स्वतःच्या भूतकाळाविषयी जाणून घेणे ही आनंदाची आणि औत्सुक्याची गोष्ट असते. त्यामध्ये अभिमानास्पद काही गोष्टी घडलेल्या असतात,अशा गोष्टींचा अभिमान वर्तमान काळातही बाळगण्याची एक मानसिकता प्रत्येक समूहामध्ये आहे. आपल्या महाराष्ट्राला तर अशा ऐतिहासिकतेची परंपरा दीर्घ कालखंडाची आहे. या परंपरेमध्ये जे कालखंड आहेत त्या प्रत्येक कालखंडाचे वैशिष्ट्य आहे.त्या वैशिष्ट्याने महाराष्ट्राचा इतिहास प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळ्या अंगाने आकाराला आलेला पाहायला मिळतो. अशा या इतिहासाचे आणि समूहाचे जे नाते असते तेच नाते इतिहास आणि साहित्याचेही असते. कारण साहित्य हे शेवटी समाजाचे प्रतिबिंब असते*

**साहित्य व इतिहासाचे नाते -**

साहित्य आणि इतिहास यांचा नातेसंबंध बघता हा परस्परांना पूरक असणारा आहे. साहित्यातून जेव्हा इतिहास शब्दबद्ध होतो तेव्हा तत्कालीन कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक हे सगळे संदर्भ साहित्यात येतात. त्याचबरोबर तत्कालीन समूहाची एकूणच मनोधारणा, नीतिमूल्य, श्रद्धा - अंधश्रद्धा हे संदर्भ शब्दबद्ध होतात.असा येणारा संदर्भ म्हणजे इतिहासकालीन कालखंडाचा आरसा असतो.

इतिहास हा तसा कथनाचा भाग असतो. हे कथन साहित्यिक जेव्हा शब्दातुन मांडतो, तेव्हा त्या कथनाला साहित्याचे अनेक बंध समृद्ध करतात. त्याचबरोबर हे कथन वस्तुनिष्ठतेला धरून असावे. त्यामध्ये सत्यता असावी, अशी अपेक्षा असते. याला अनुसरून लेखक एका सत्यशोधकांच्या भूमिकेतून ऐतिहासिक घटना, प्रसंग यांच्याकडे बघत असतो. पण काहीवेळा ऐतिहासिक कादंबरी लेखनाला यातून थोडीशी सूट मिळते. मूळ ऐतिहासिक घटना प्रसंग साहित्यातून मांडताना जी कलात्मकता या यावी लागते, त्यासाठीही सुट असते. या कलात्मकतेमुळे ऐतिहासिक घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा वाचनीय होतात. या वाचनूतच इतिहास वाचकांसमोर उलगडत जातो . साहित्यातून उलगडणारा इतिहास बरेचदा आकर्षक, रोमांचकारी आणि उत्साहवर्धक अशा स्वरूपाचा असतो. त्यामुळे असे म्हणता येते की, साहित्यातून बराचसा इतिहास वाचकांच्या पर्यंत पोचतो , जो इतिहास कालीन साधनांमधून पोहोचू शकत नाही.

**मराठीतील ऐतिहासिक कादंबरीचा इतिहास -**

मराठी साहित्यात रा.भी. गुंजीकर यांनी मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी' मोचनगड' ही लिहिली. गुंजीकर यांच्या या प्रेरणेतून पुढे ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. हरिभाऊ आपटे यांनी आपल्या कादंबरी लेखनाचे वेगळेपण जपतानाच ऐतिहासिक कादंबऱ्याही लिहिल्यात. म्हैसूरचा वाघ, केवळ स्वराज्यासाठी, रुपनगरची राजकन्या, चंद्रगुप्त, गड आला पण सिंह गेला, सूर्योदय, माध्यान्ह, सूर्यग्रहण,

वज्राघात अशा एका पाठोपाठ ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून स्वदेश, स्वदेशाचा इतिहास आणि त्यासंबंधीचा अभिमान, उज्वल भूतकाळ जनमानसात जागृत केला. पुढे नाथमाधव ( द्वारकानाथ माधव पितळे )यांची 'सावळ्या तांडेल' ही गाजलेली ऐतिहासिक कादंबरी होय. नाना आपटे यांच्या' अजिंक्यतारा',' रजपुतांचा भिष्म', लांच्छीत चंद्रमा', याच प्रमाणे चि.वि.वैद्य यांची'दुर्दैवी रंगू' गो. गो. मुजुमदार वि.वा. भिडे यांची'कोरलाईचा किल्लेदार', चि. ग.भानू यांची' शृंगेरीची लक्ष्मी', डॉ.ना. दा. सावरकर यांची' मरण की लग्न', न.चि.केळकर यांची' कोकणचा पोर', प्र.के.अत्रे यांची' मोहित्यांचा शाप', प. स. देसाई यांची'अग्निवर्षा','आसुरी लालसा','झाशीवाली राणी', अठराशे सत्तावन चा वणवा' अशा एकापाठोपाठ एक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. याचबरोबरीने वि.वा.हडप यांनी पेशवाईवर एकूण तेरा कादंबऱ्या लिहून संपूर्ण पेशवाई कालखंड शब्दबद्ध केला. या पुढील कालखंडात याच ऐतिहासिक लेखनाच्या वाटचालीत भर घालत ना. स. इनामदार, शिवाजी सावंत, रणजित देसाई, विश्वास पाटील अशा दिग्गज लेखकांनी इतिहास कालीन व्यक्तिरेखा, घटनांवर आपल्या आकर्षक शैलीने लेखन केले. त्यांच्या लेखनातून एक -एक ऐतिहास पर्व वाचकांसमोर अलगदपणे उलगडत गेले. खरतर यांच्या लेखणीतून इतिहासातील अनेक घटना, व्यक्तिरेखा समोर आल्या. ऐतिहासिक कादंबरी लेखकांचे हे योगदान मराठी वाचकांना मोलाचे ठरणारे आहे

**लेखक - अनंत तिबिले -**

कोल्हापूरच्या उत्तरेश्वर पेठेत जन्म झालेले तिबिले यांना लिहिण्याची आवड लहापणापासूनच होती. वयाच्या १६व्या वर्षी त्यांनी पहिली कथा लिहिली, परंतु त्यांची पहिली कादंबरी प्रकाशित होण्यास १९७८ साली प्रकाशित झाली. त्यांच्या लेखनाच्या प्रकाशनासाठी इतका कालखंड जावा लागला. त्यावेळी त्यांचे वय होते ४४ वर्षे. त्यानंतर ३६ वर्षे त्यांनी झपाटल्यासारखे लेखन केले. त्यांच्या प्रकाशित कादंबऱ्यांची २९१ आणि रहस्यकथा आहेत २५० आहेत.

शारीरिक शिक्षण या विषयाचे शिक्षक म्हणून नोकरी करीत, तिबिले यांनी व्रत घेतल्याप्रमाणे सतत लेखन केले. त्यांच्या कादंबऱ्यांपैकी अनेक कादंबऱ्या ऐतिहासिक विषयांवरील आहेत. त्यासाठी त्यांनी संबंधित विषयांचा, व्यक्तिरेखांचा अभ्यासही केला.'आम्ही शर्थ केली' (छत्रपती शहाजी महाराज), 'अग्निरेखा' (महाराणी जिजाबाई),' गरुडझेप'(छत्रपती शिवाजी महाराज),' शापित राजहंस'(छत्रपती संभाजी महाराज),' भद्रकाली'(महाराणी ताराराणी),'पितामह' (भीष्माचार्य),' अवलिया' (गुरूनानक),' विडा रंगला नाहीच' (छत्रपती राजाराम महाराज) आदी ऐतिहासिक कादंबऱ्यांनी वाचकांना एक वेगळी अनुभूती दिली. मार्च १९७८ मध्ये त्यांची छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित'शापित राजहंस' ही कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीतून छत्रपती संभाजी महाराज यांची पराक्रमी आणि तेजस्वी कारकीर्द तिबिले यांनी उलगडून सांगत मराठी वाचकांचे लक्ष वेधले. कादंबरीच्या सहा आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. ३०० कादंबऱ्या पूर्ण करण्याचे त्यांचे स्वप्न होते.'स्पृश्य-अस्पृश्य' या नावाने तीन भागात आत्मचरित्र लिहिण्याचा संकल्प त्यांनी सोडला होता. त्याच्या पहिल्या भागाचे लेखन पूर्ण झाले आहे.'हा तो दैवयोग आहे' हा त्यातील पहिला भाग आहे.सभा, संमेलनांमध्ये रमणारे तिबिले अनेक छोट्या-मोठ्या संमेलनांना सामान्य रसिकांप्रमाणे उपस्थित राहायचे. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेने बेळगाव जिल्ह्यातील कुद्रेमणी येथे झालेल्या संमेलनाचे अध्यक्षपद देऊन त्यांचा सन्मान केला होता.

पुरस्कारांच्या दुनियेपासून ते कटाक्षाने दूर राहिले. आपली पुस्तके मोठ्या प्रमाणावर वाचली जातात, ती वाचकांना आवडतात याचेच त्यांना समाधान होते. वाचकांकडून येणारी पत्रे हेच आपले पुरस्कार असल्याची त्यांची धारणा होती.

कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक ग्रंथालयांना आपल्या संग्रहातील पुस्तके भेट देऊन ग्रंथालय चळवळ विस्तारण्यासाठी त्यांनी हातभार लावला. लोकप्रिय ऐतिहासिक कादंबऱ्या आणि अनंत तिबिले हीच जणू त्यांची ओळख बनली होती

तिबिले यांच्या रचनेतून साकारलेली -'महाराणी येसूबाई'

अनंत तिबिले यांच्या अनेक ऐतिहासिक कादंबऱ्यांपैकी' रिया पब्लिकेशन्स' च्या वतीने प्रकाशित झालेली 'महाराणी येसूबाई' ही एक कादंबरी. २०१२ मध्ये याची दुसरी आवृत्ती निघाली. मुखपृष्ठावर असणारा येसुबाईंचा दृढनिश्चयी चेहरा आणि पार्श्वभूमी म्हणून किल्ले रायगड,संभाजी महाराज यांचा अस्पष्ट चेहरा, त्याचबरोबरीने महाराणी येसूबाई यांच्या काळातील शिक्का, असा एक बोलका भाव मुखपृष्ठावर आहे. या बोलक्या भावाचे प्रतिबिंब कादंबरीमध्ये अनुभवता येते. कादंबरीच्या कथानकाची सुरुवात पिलाजीराव शिर्के छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भेटीला गेले, तर शेवट रामराजे ताराऊंसह जिंजीला पोहोचले, असा झालेला आहे. सुरुवातीची पिलाजीराव शिर्के यांची ही भेट म्हणजेच त्यांची कन्या राजस हिचा विवाह छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुत्र संभाजी यांच्याशी करण्याचा निश्चय होय. या विवाहाच्या वेळी राजसबाईंच वय अगदी लहान आहे.

त्यावेळच्या रीतीनुसार वडील मंडळी लग्नाची बोलणी करतात आणि राजसबाई भोसल्यांच्या घराण्यात येसूबाई म्हणून प्रवेश करते. अगदीच वय लहान असल्याने येसुबाईंची सर्वार्थाने काळजी जिजाबाईच घेत. शिवपुत्र संभाजी च्या बरोबरीने जिजाऊनी येसूबाईंनाही आपल्या पंखाखाली घेतलं. त्यामुळे लहान वयापासून जिजाऊंचा जो सहवास मिळाला त्यातच येसुबाईंची जडणघडण झालेली आहे. अगदी लहानपणी आपल्याला एक घोडा हवा, असा हट्ट करणारी येसू जिजाऊंच्या कौतुकाचा विषय आहे. कारण हा हट्टच भविष्यातील तिच्या वाटचालीचा दाखला आहे. लेखकाने अशा लहानसहान प्रसंगातून मोठी होणारी येसूबाई इथे उभी केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज संभाजीराजेंना आपल्या सोबत नेहमीच मोहिमांवर नेत असत.मोहिमांवर नेणे म्हणजे हे एक प्रकारचं युद्धनीतीच, राजकारणाच शिक्षण होतं. त्यातून हिंदवी स्वराज्याचा भावी राजा घडत होता. हा भावी राजा कसा घडतो हे पहातच येसूबाईही अजाणतेतून सजाण होत जाते. लेखकाने महाराणी येसूबाईंचं हे सजाण होत जाणं लहान सहान प्रसंगांमधून उभे केले आहे. तत्कालीन ऐतिहासिक वातावरण, एकूण बोलण्याची शैली, भाषेमध्ये असणारे उर्दू, फारसी शब्द त्यांचा लहेजा आणि त्याला उचित अशी वाक्यरचना अशा मांडणीतून येसुबाईंची ही सुजाणता लेखक शब्दांकित करतात. जिजाबाईंशी येसुबाईंचा संवाद अधिक होताना दिसतो. हा संवाद म्हणजे एका अर्थाने लहान सहान गोष्टी जाणून घेण्याची क्रीया आहे. हळुहळू मोठं होताना भोसले यांची ही सून वयानेही मोठी होत गेली. वयाला साजेसाच समंजसपणा बोलण्यातून, वागण्यातून येऊ लागला. समोरची व्यक्ती कोण आहे, त्यावर प्रतिक्रिया काय द्यावी, कोणत्या पद्धतीने बोलावं याचा एक एक स्वभावगुणच बनत गेला. अनंत तिबिले यांच्या लेखणीतून हा सगळा इतिहास डोळ्यांसमोर येत जातो. वास्तविक छत्रपती शिवाजी महाराजांची ही जेष्ठ सून. त्यानी स्वतः आपल्या पुत्रासाठी पसंत केलेली.

त्यामुळे तिच्या जडण-घडणीत छत्रपतींचाही हातभार आहे. कधी बोलण्यातून , कधी भेटीतून छत्रपतींचा सहवास येसूबाईंनी अनुभवलेला आहे. या सगळ्या प्रवासात छत्रपतींचा आदर्श तिच्यासमोर नेहमीच राहिलेला आहे. हा आदर्श आणि जिजाऊमासाहेबांचे संस्कार यात या दोन्ही मुशीतून महाराणी येसूबाई यांची जडणघडण होताना दिसते.

**येसूबाई आणि संभाजीराजे -**

ज्यावेळी पती-पत्नी नात्याचा अर्थ येसूबाईंना समजू लागला, त्याचेही चित्रण लेखक लहान मोठ्या प्रसंगातून करतात. शंभुराजे घोड्यावरुन पडल्यानंतर येसुबाईंच्या जीवाची होणारी घालमेल, अनुमती न घेताच महालात प्रवेश करणारी येसूबाई म्हणजे समंजसपणे नाते स्वीकारणारी दिसते. या नात्याचा स्वीकार

करतानाच तिने काही नोंदी आपल्या मनात केलेल्या दिसतात. संभाजीराजे यांचा स्वभाव, पराक्रमी वृत्ती, रोखठोकपणा हे सगळे स्वभावातील कंगोरे येसूबाईंनी पक्के हरलेले आहेत. रणभूमी हीच कर्तव्यभूमी म्हणून गनीमाशी दोन हात करणाऱ्या शिलेदाराची आपण सहधर्मचारिणी आहोत, याचे लख्ख भान येसूबाईंना आहे. त्यामुळे सहजीवन सुरू होतानाच्या टप्प्यावरही जेव्हा जेव्हा मोहिमेवर किंवा कामानिमित्त शंभुराजे गेले तेव्हा येसूबाईंनी ते सर्व आनंदाने स्वीकारलेले आहे.

आनंदाने स्वीकारलेल्या नात्याची जबाबदारीही येसूबाई तितक्यात समर्थपणे पेलतात. शंभुराजांशी बोलताना त्यांना समजून घेणे, वेळप्रसंगी धीर देणे, गरज पडल्यास सल्ला देणे आणि कितीही वियोग सहन करावा लागला तरी त्यांच्या कोणत्याही मोहिमेच्या आड न येणे, हे सगळं येसूबाई समजून-उमजून करतात. शंभूराजांनाही याची जाणीव आहे. त्यामुळे ते सुद्धा आपल्या मनातील इतरत्र बोलता येणार नाही असे जे-जे आहे ते - ते सारं खुल्या मनाने येसूबाईंसमोर व्यक्त करतात.

जेव्हा शिवाजीराजांनी स्वराज्याच्या राज्यकारभाराची जबाबदारी संभाजीराजांवर सोपवली, तेव्हाचा प्रसंग तर अगदी बोलका आहे. शंभूराजांना या जबाबदारीपेक्षा मोहिमांच्या जबाबदाऱ्या अधिक जास्त महत्वाच्या वाटतात. त्याना स्वतःला मुळात गादीवर बसण्याचा हव्यासही नाही. त्यामुळे ही जबाबदारी सोपवण्यापूर्वी आबासाहेबांनी आपणास विचारायला हवे होते, असे ते येसूबाईंना बोलून दाखवतात. त्यावेळी येसूबाई अत्यंत विचारपूर्वक त्यांना समजून घेत, आबासाहेबांच्या निर्णयाचे उचितपण शंभुराजांना समजावून सांगतात. राज्यकारभाराचे गुंते सोडवायला चातुर्य, चाणाक्षपणा, मुत्सद्दीपणा असावा लागतो. हे सारं अनुभवाने येतं. तो अनुभव यावा म्हणूनच आबासाहेबांनी दौलतीच्या भावी स्वामींना या आखाड्यात उतरवलं आहे. अशी दोघांची बाजू समजावून देत, शंभूराजांना दिलासा देते. येसुबाईंचा हा समंजसपणा वयाने, अनुभवाने, आसपासच्या वातावरणाने प्रगल्भ होत गेला तेव्हा जिजाबाईंनी सुद्धा शंभूराजांना येसूबाईंकडे सोपवत पाचाडला राहणे पसंत केलेले आहे.

महाराजांच्या द्वितीय पत्नी सोयराबाई यांचा स्वभाव आणि एकूणच महत्वकांशा ही सत्तेशी संबंधित होती. त्यामुळे त्या नेहमीच शंभूराजेंशी बोलताना, वागताना वेगळ्या पद्धतीने वागत. त्यांच्या या वागण्याच्या पद्धती ची जाणीवही येसूबाईंना होती. अशावेळी सोयराबाईंचे मन दुखवायचे नाही आणि त्यांच्याशी आदराने वागवायचे, ही कसरत सुद्धा त्या वेळोवेळी करत. बरेचदा शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीमध्ये सगळा कारभार शंभुराजे पाहात. जर अशावेळी काही अडचण आलीच तर त्या स्वतः शंभुराजांना आवश्यक तिथे सल्ला देत. इंग्रजांचा वकील निकोलस जेव्हा शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीमध्ये गडावर मीठ आणि लाकूड याबाबतच्या परवाना मिळविण्यासाठी आला तेव्हा येसूबाईंनी त्याचा धूर्तपणा ओळखून शंभुराजेंना तशी जाणीव करून दिली. दरबारातल्या जुन्या-जाणत्या लोकांची बदललेली मानसिकता, राजदरबारातील होणारे बदल या सगळ्यांचा अचूकसा वेध घेऊन संभाजीराजांना सावध करत. आपल्या तापट स्वभावामुळे जुन्या-जाणत्या हस्तींना दुखावू नये, असा सूचक सल्लाही देत. एकूणच संभाजीराजांच्या सगळ्या वाटचालीत त्यांचा जी भूमिका होती ती अशी समंजस, भक्कम सहजीवनाची होती.

**मुत्सद्दी येसूबाई -**

छत्रपतींच्या मनात भावी वारसदार म्हणून शंभूराजांचा विचार चाललेला आहे, याचा कानोसा लागताच सोयराबाईंही तितक्यात तडफेने आपल्या मुलाचा त्या ठिकाणी हक्क आहे, हे सिद्ध करण्यासाठी तयार झाल्या.हे सिद्धीस नेण्यासाठी काहीही करू, असा इरादा पक्का केला. येसूबाईंना हे माहिती होते. प्रत्यक्ष जेव्हा छत्रपतींनी भावी राजा म्हणून शंभूराजांना मान्यता दिली, तेव्हा आनंद होण्याऐवजी येसुबाईंच्या चेहऱ्यावर चिंता अधिक पसरते, ती यामुळेच. रायगडावर जेव्हा सोयराबाईंचा हस्तक्षेप वाढतो, तेव्हा घरातच गृहकलह

निर्माण होतो आणि हे थांबविण्यासाठी शिवाजी महाराज संभाजीराजेंना येसूबाईंसह शृंगारपूरास पाठवितात. तत्पूर्वी स्वतः राजेंनी येसूबाईंशी या विषयावर संवाद साधलेला आहे. स्वराज्याचा वाढता कारभार, जबाबदारी आणि नव्याने उठलेला भावी राजपदाचा कल्लोळ ; या सगळयांमध्ये संभाजीराजेंना एकट्या येसूबाईंच स्थिर ठेवू शकतील, हा विश्वास त्यामध्ये होता. येसूबाईंनीही महाराजांची ही मनस्थिती ओळखून तशी पावले उचलायला सुरुवात केली. महाराजांची आपल्या रामराजे आणि संभाजीराजे या दोन पुत्रांमध्ये कोणत्याही प्रकारचे वितुष्ट येऊ नये म्हणून मनातून त्यांनी दोन्ही पुत्रांसाठी वचनांची तशी सोयही करण्याची तयारी आहे, हे येसूबाईंनी ओळखले होते. पण त्यामुळे गृहकलह थांबेल याची मात्र त्यांना खात्री नव्हती. आपण शृंगारपुरी राहिल्यास कदाचित यावर तोडगा निघेल एक असा विश्वास होता. त्यामुळे संभाजी राजेंची सोबत करत येसूबाई शृंगारपूर, पन्हाळगड असं वास्तव्य करत राहिल्या. येसूबाई शृंगारपूरास वास्तव्यास आल्या तेव्हा छोटी भवानी ही राजकन्या त्यांच्यासमवेत होती. याच दरम्यान संभाजी महाराज वेगळयाच कल्पनेने भारावून जात पुढे दिलेरखानाला मिळाले. शंभुराजे असं काही करतील, हे मात्र येसुबाईंच्या कधीही धनी - मनी आलं नव्हतं. त्यामुळे हा त्यांना फार मोठा धक्का होता. दिलेरखानाची मदत घेऊन नवीन राज्य उभारावं आणि वडिलांची मिळविलेले स्वराज्य न विभागता तसंच राहू द्यावं हा त्यांचा मानस होता. मात्र हा त्यांचा सगळा बेत फसला आणि संभाजीराजे सगळया दृष्टीने निंदानालस्तीचे धनी बनले. अशा अवघड प्रसंगी सुद्धा महाराणी येसूबाईंनी राजेसंभाजी यांचं मन समजून घेतलं.असे अनेक प्रसंग आहेत, ज्या ठिकाणी वादाची, चकमकीची ठिणगी पडते आणि त्याला शांतपणे सामोरी जात येसूबाई समजुतदारपणा दाखवितात. लेखकाने येसुबाईंचा हा समंजस मुत्सद्दीपणा अनेक प्रसंग रुपाने या कथानकात मांडलेला आहे. संभाजींचे गुरु असणारे उमाजी पंडित केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांना व्यभिचारी बनवतात. सोयराबाई स्वतःच्या पुत्र हितासाठी या पिता-पुत्रांच्या मध्ये ताटातूट करताहेत, हे ओळखणाऱ्या येसूबाई नक्कीच मुत्सद्दी होत्या.

**नात्यांची वीण ओळखणाऱ्या येसूबाई -**

येसूबाई अगदी बालवयातच भोसले घराण्यात सून म्हणून आल्या. तेव्हा सून यापेक्षा त्यांना भोसले घराण्यातल्या प्रत्येकाने कन्येच्या रूपाने प्रथम स्वीकारले. कारण अगदी बालवयात या परक्या ठिकाणी आलेल्या या मुलीला इथे रूजवायचं असेल तर, याच नात्याने तिला स्वीकारायला हवं, हे जिजाऊंनी जाणलं होतं. त्यामुळे जिजाऊंनीच तिच्यासाठी हे पहिलं पाऊल उचललं. साहजिकच या अशा आश्वस्त वातावरणात वाढताना येसुबाईंच्या मनात सासर किंवा तत्सम विचार, नात्यांमध्ये दुरावा असा कोणताही संदर्भ आलेला दिसत नाही. वय वाढलं तसं त्याची जाणीव व्हायला लागली पण त्यामध्ये दुरावा आलेला नाही. जिजाऊंच्या बद्दल तर त्यांच्या मनात कायमच प्रेमयुक्त आदर राहिला. खूप मोठा आधार देणारं मायेचे माणूस, अशीच प्रतिमा त्यांच्या मनात होती. खुद्द शिवाजीराजे यांच्याप्रती येसुबाईंच्या मनात पितृवत प्रेम होते. आबासाहेब कोणतीही गोष्ट चुकीची करणार नाहीत इतका दृढ विश्वास राजेंवर होता. त्यामुळे मग सदरेवरचे निर्णय असू देत, शंभूराजेंबद्दलचे निर्णय असू देत, आणखी कोणते निर्णय असू देत येसूबाईंनी कधीही राजेंच्या निर्णयावर शंका घेतली नाही.शिवाजीराजांनाही येसूबाईंबद्दल कधी आपपरभाव मनात आला नाही. उलट संभाजीराजांना येसूबाईंच हाताळू शकते, हा विश्वास होता.शिवाजीराजांच्या द्वितीय पत्नी सोयराबाई हिच्या मनात हळूहळू सावत्र भाव निर्माण होऊ लागला. दौलतीचा वारसदार आपलाच मुलगा व्हावा, ही इच्छा प्रबळ होऊ लागली. हे जाणबूनही येसूबाईंनी कधी त्यांचा दुश्वास केला नाही.वेळ येईल तेव्हा रामराजेच या दौलतीचे हक्कदार बनतील असा विश्वास स्वतःलाच देत, त्या योग्य संधीची वाट पाहत राहिल्या. पुतळाबाईंचे वात्सल्य त्यांच्या मनात ओलाव्याचे ठिकाण होते. राजदरबारातील सर्व अधिकारी, सेवक वर्ग, महालातील इतर सेवक वर्ग या सगळयांना ओळखून त्यांच्याशी वागण्याचा कसंब येसुबाईंच्या ठाई होतं. त्यामुळे पुढे त्या सर्वांच्या प्रती मातोश्री बदल्या.

**धडाडीच्या येसूबाई -**

महाराणी येसूबाई या संपूर्ण कादंबरीमध्ये उभ्या राहतात, ते एक धडाडीचे नेतृत्व म्हणून. स्त्री म्हणून लहानपण संपलं आणि एकेक जबाबदारी त्यांच्यावर पडत गेली. त्या प्रत्येक जबाबदारीत त्यांनी स्वतःच मन विचलित होऊ न देता योग्य निर्णय घेतात.हे करत आपल्यातील जबाबदारीचा, समंजसपणाचा, निर्णयक्षमतेचा आणि मुत्सद्दीपणाचा गूण सिद्ध केलेला आहे. प्रसंग कोणताही असू दे त्यातील बारकावे, त्यात सामील असणारी माणसे, एकूण वातावरण या सगळयाचा विलक्षण वेध घेणारी त्यांची मनोवृत्ती लक्षणीय आहे. संभाजीराजेंचा स्वभाव आणि राजकीय वातावरण यांचं फारसं जुळत नाही, हे त्यांनी स्पष्टपणे ओळखलेलं आहे. त्यामुळे संभाजीराजेंना कधी, कुठे, कसं वळवायचं हे कौशल्य त्यानक अवगत केलं आहे. त्यांच्या गैरहजेरीत मसनद नदीवर बसून कारभार बघणे. योग्य निर्णय घेणे, लहान-मोठे तंटे सोडवणे आणि व्यक्तिपरत्वे मुलाहिजा बाळगत तोडगा काढणे, हे त्या कौशल्याने करतात. राज्यकारभार करण्याची त्यांची हातोटीही तितकीच कौतुकास्पद आणि धाडसी आहे.

त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यात जे काही प्रसंग आलेत त्यालाही त्या तितक्याच धडाडीने आणि स्वीकारार्ह वृत्तीने सामोरे गेल्या. यातला पहिला प्रसंग म्हणजे महाराजांची आग्र्याहून सुटका झाल्यानंतर महाराज एकटेच गडावर पोहोचतात आणि शंभूराजे कालवश झाल्याची बातमी देतात. हा खूप मोठा मानसिक धक्का येसुबई असतो. त्या धक्क्यातून सावरत सती जाण्याचा निर्णय घेतात.पण सत्यस्थिती राजेंना माहिती असल्यामुळे त्यांच्या या निर्णयाला कोणीच अनुमती देत नाही. अशावेळी अगदी कोवळया वयात विधवेचे जीवन काही काळ येसूबाईंना जगावं लागलेलं आहे. या कालखंडातील त्यांची मनस्थिती जितकी जीवघेणी होती, तितकीच वेदनादायीही होती. त्यानंतर जिजाऊंच्या मृत्यू प्रसंगी त्यांची झालेली स्तिती केविलवाणी होती. प्रत्यक्ष आपल्या मायेचा आधार गेला या जाणिवेने त्या कोलमडल्या. पुढे शिवाजी महाराजांच्या निधनाने येसूबाईंवर झालेला आघात खूप मोठा होता. या आघाताने त्यांना खूप काही शिकवलं. दुःख पचवायला आणि उभं राहायलाही. त्यामुळेच त्यांच्या आयुष्यातल्या सगळयात मोठ्या कठीण प्रसंगात दुःख विषाप्रमाणे पचवलं. हा प्रसंग म्हणजे राजे संभाजींना प्रत्यक्ष शत्रूने पकडले आणि त्यांची छळयात्रा सुरू केली. अशावेळी त्यांच्या छळाच्या बातम्या ऐकत रायगडावर राणी येसूबाई कारभार चालवीत राहिल्या. काळजावर दगड ठेवत वतनाला कोणताही धोका पोहोचू नये म्हणून त्यांनी एकेक दिवस हाताळलेला आहे. शेवटी शंभराजेंच्या मृत्यूची बितमी येते. या बातमीने त्यांच्या आयुष्यातील एक पर्व संपले आहे. इथून पुढे समोर येणाऱ्या येसूबाई या फक्त शिवाजी महाराजांच्या स्नुषा म्हणून आपल्या समोर येतात. ज्या वादळा सोबत जगताना दुसरं कोणतंही लहान-मोठं वादळ सहन करण्याची शक्ती आपण कमावली. ते वादळच आता नाहीस झालं या जाणिवेने त्या पूर्णतः कोलमडून गेल्या. अशा अवस्थेतही शिवाजी महाराजांची शिकवण त्या विसरत नाहीत. हे त्यांचे मोठेपण आहे.

त्यामुळेच जेव्हा रायगडाचे भवितव्य धोक्यात येते तेव्हा क्षणाचाही विलंब न करता रामराजेंना ताराऊंसह सुखरूपपणे जिंजीला पाठवतात. शक्य होईल तेवढा रायगड लढवितात. येसूबाईंसमोर आता फक्त मराठी दौलतीचा वारस सुखरूप आहे. याचच समाधान होतं. स्वतःच्या भवितव्याची, लहान मुलाची फिकीर नव्हती. यांच्या आयुष्यातील हे शेवटचे पान म्हणजे इतिहासातील अत्यंत महत्त्वाचं पान आहे. कादंबरी इथेच संपलेली आहे.

महाराणी येसुबाईंच्या आयुष्यातील इथून पुढचा काळ म्हणजे, आयुष्यात जे भोगले त्याच्याहीपेक्षा काठीण्याचा काळ होता. येसुबाईंच्या आयुष्यात खूप मोठा बदल झाला. मनात प्रचंड दुःख, समोर पराजय, सोबत लहान मुलगा आणि अवतीभवती परधर्मीय शत्रूचे सैन्य, अशा अदृश्य साखळदंडात त्या बंदिस्त झाल्या. एकोणतीस वर्ष त्या आपल्या पुत्रासह शत्रूच्या नजरकैदेत राहिल्या. आतापर्यंत दुःख असलं तरी स्वजनांत त्या राहिलेल्या होत्या. पण आता मात्र माणसं, मुलुख, धर्म सगळंच काही वेगळं होतं. परधर्मीय शत्रूच्या छावणीत मुलास स्वतःला सावरत राहिलेल्या येसूबाई हिंदवी स्वराज्याचे एक अनमोल लेणं आहे. हा त्यांचा

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Special Issue – 281 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal Impact Factor 6.625 (SJIF)
E-ISSN : 2348-7143
November- 2021

खूप मोठा त्याग आहे. मुळातच कोणताही मोह नसल्यामुळे हा त्यागही त्यांनी समंजसपणे स्वीकारला. हे स्वीकारून एक प्रकारे हिंदवी स्वराज्याचे भवितव्य सुरक्षित ठेवले. संभाजीपुत्र शाहूला सोबत ठेवत स्वराज्यामध्ये विभागणी होणार नाही याची काळजी घेतली.अशा या महाराणी येसूबाई अनंत तिबिले यांच्या कादंबरीतून उलगडत जातात. एका राजघराण्यातल्या स्त्रीने आयुष्य आरामात राहण्याचे सोडून अत्यंत निष्ठेने, त्यागमय वृत्तीने जे काही जगणे स्वीकारलेले आहे, त्या जगण्याचे मोल करता येत नाही.

**निष्कर्ष -**

१) अनंत तिबिले यांच्या कादंबरीतून महाराणी येसूबाई त्यांच्या बालपणापासून उलगडत जाते.
२) महाराणी येसूबाई राजकारणात वावरतानाही एक कणखर स्त्री म्हणून वावरतात.
३) महाराणी येसूबाई यांचा एकूणच स्वभाव हा जितका प्रेमळ तितकाच समंजस आणि कठोर निर्णयक्षमता असणारा आहे.
४) कोणत्याही प्रसंगाला कुठेही न डगमगता सामोरं जाणं हा त्यानी आपला स्वभावधर्म बनविला.
५) आपला पती पराक्रमी आहे पण स्वभावाने तितकाच तापट आहे, हे सत्य स्वीकारून त्यांच्या पराक्रमाला कुठेही उणेपणा न आणता, संतापाला आवर घालण्याची कसंब त्यांनी वृत्तीत जोपासले आहे.
६) शिवरायांची शिकवण लक्षात ठेवून कठीण प्रसंगीही सद्सद्विवेकबुद्धीने त्या वागतात.
७) गड गेले तरी चालतील पण वतनाला धक्का पोहोचता कामा नये, हे ओळखून अटीतटीच्या प्रसंगी आपल्या पुत्रासह शत्रूला शरण जातात.
८) महाराणी येसूबाईंना ओळखण्यात सोयराबाई मात्र कमी पडल्यात. त्यामुळेच वतनाच्या वारसा विषयी असे कठीण प्रसंग निर्माण झालेत.
९) दरबारातील जुनी निष्ठावंत माणसे आता कळत-नकळत स्वार्थी बनत चाललेली आहेत, हे सत्य फार लवकर येसूबाईंनी ओळखले होते.

**समारोप -**

अनंत तिबिले यांच्या' महाराणी येसूबाई' या कादंबरीतून येसूबाई यांची व्यक्तिरेखा अशाप्रकारे वाचकांसमोर येते.खरेतर इतिहासामध्ये येसुबाईंच्या या त्यागमय वाटचालीचा कुठेच लिखित संदर्भ येत नाही. त्यांनी जो काही त्याग केलेला आहे त्याचाही उल्लेख इतिहासाच्या पानावर येत नाही. मात्र साहित्याच्या माध्यमातून महाराणी येसूबाई यांचे एकूणच व्यक्तिमत्त्व, त्यांची त्यागमय वृत्ती, तडफदारपणा, निःस्वार्थी भावना आणि नात्यांवरील निष्ठा हे सर्व या कादंबरीच्या निमित्ताने स्पष्ट होत जाते. त्यातून महाराणी येसूबाई यांच्या बद्दलचा अभिमान अधिक प्रज्वलित होतो. त्यामुळे असं म्हणता येते की, इतिहास हा फक्त लिखित असतो पण त्या इतिहासाला जिवंत करण्याचे काम साहित्य करते.कारण साहित्यामध्ये येणारी शब्दरचना त्यातील व्यक्तिरेखांना, भावनेला जिवंतपणा आणते. त्या व्यक्ती विषयी सर्वांगाने विचार मांडते. एका बाजूला पराक्रम, शौर्य आणि दुसऱ्या बाजूला कुटुंब, नातेसंबंध या दोन गोष्टी तील गुंता उकलताना माणूस म्हणून त्याचे विचार, भावनाविश्व याच्यावरही प्रकाश टाकते. सत्याला अधिक प्रखर बनवते आणि माणसातील माणूसपण निरखत त्यांच्यातील तेजस्वीपण शब्दबद्ध करते. त्यामुळेच इथे येणारा इतिहास रंजक असेल पण त्यातला केंद्रबिंदू मात्र एका सत्याचाच अंगाने आलेला असतो.

**संदर्भ :**

१. महाराष्ट्र समाज आणि संस्कृती - प्रा.अ.रा. कुलकर्णी, डायमंड प्रकाशन, पुणे
२. साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन - प्रभाकर बागले, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

३. साहित्यवेध - के.रं. शिरवाडकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
४. मराठी वांङ्मय प्रकार : स्वरूप, संकल्पना व वाटचाल - संपादक : डॉ. द.के. गंधारे,शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
५. अर्वाचीन मराठी वांङ्मयाचा इतिहास – प्राचार्य डॉ. वसंत बिरादार, कैलाश पब्लिकेशन्स,औरंगाबाद

RESEARCH JOURNEY